# पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नाशिकचा सन २००७-२००८
# या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र स्था/३/ब/जिप/पशुसंवर्धन/नाशिक/१४६०

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,
नाशिक
दिनांक :- २१.०४.२००९

प्रेषक,

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

नाशिक जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचे सन २००७-०८ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण श्री. संजय क. गायकवाड, निवड श्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, यांनी दि. १६.१२.२००८ ते २०.१.२००९ या कालावधीत पुर्ण केले. या अहवालाचे पुनर्विलोकन श्री. उ. प्र. जोशी, लेखा परीक्षा अधिकारी यांनी दिनांक २१.२.२००९ रोजी केले व अहवालावर चर्चा करुन अंतीमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २८.०२.२००९ रोजी केले.

लेखा परीक्षीत आर्थिक वर्षाच्या कालावधीत खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

अध्यक्ष :-

| | |
|---|---|
| श्री. राधाकिसन सोनवणे | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

मुख्य कार्यकारी अधिकारी :-

| | |
|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर राजूरकर | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

सभापती (कृषि समिती) :-

| | |
|---|---|
| श्री. शैलेश पवार | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-

| | |
|---|---|
| श्री. एल.एल.कोरडे | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण)

मागील लेखा परीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असुन त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्र पत्र व्यवहार सुरु आहे.

| अ. क्र | वर्ष | परिरच्छेद क्रमांक | परि. संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९७९-८० | ११ | १ |
| २ | १९८०-८१ | ६,८,२२ | ३ |
| ३ | १९८१-८२ | १६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि.क्र.१६ :- बांधकामाच्या उपलब्ध न केलेले कागदपत्राबाबत (५.३५७) | १ |
| ४ | १९८२-८३ | १४ | १ |
| ५ | १९८३-८४ | ५,१५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि. क्र. १५ :- कागदपत्रे लेखा परीक्षणात उपलब्ध केली नाही. (५.२८५ अ) | २ |
| ६ | १९८४-८५ | ११,१५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि. क्र. १५:- बांधकामासाठी कागदपत्रे लेखा परीक्षणात उपलब्ध केली नाहीत. (५.३०५)(अ) | २ |
| ७ | १९८५-८६ | १०,११(अ,ब)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि.क्र ११(अ,ब) :- कागदपत्रे लेखा परीक्षणात उपलब्ध केली नाहीत. (५.४२९) | २ |
| ८ | १९८६-८७-८८ | ९,१४(१),१७,<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि.क्र९ :- बांधकामासाठी कागदपत्रे उपलब्ध केली नाही.(५.४१२) | ३ |
| ९ | १९८८-८९ | ११,१३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि. क्र. ११:- कागदपत्रे उपलब्ध केली नाही.(५.३६(अ)) | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | १९८९-९० | ४,१०<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि. क्र. १०:- जादा वेतन अदा केलेबाबत, (५,३१) | २ |
| ११ | १९९०-९१ | ४,१५ | २ |
| १२ | १९९१-९२ | ७,११ | २ |
| १३ | १९९३-९४ | १६ | १ |
| १४ | १९९४-९५ | ५,६ | २ |
| १५ | १९९५-९६ | ६,७ | २ |
| १७ | १९९७-९८ | २२ | १ |
| १९ | २०००-२००१ | १२,१५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि. क्र.१२ :- आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांच्या दूभत्या, भाकड, गाभण, जनावरांना १०० टक्के अनुदानावर खाद्य पुरवठा (३,४३०)<br>परिच्छेद क्र १५:- औषधी खरेदी (योजनेत्तर) (३,४३१) | २ |
| २० | २००१-२००२ | ११,१४,१५,२१(३,५)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि. क्र. ११:- सि.डी.खरात चुकीची वेतननिश्चिती अतिप्रदान (३,५२४(१४)) | ४ |
| २१ | २००२-२००३ | ३,६,१८,१९,२२(४ ते ६)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि. क्र. ३ :- जिल्हा परिषद रोख अनुदानातुन साथीच्या रोगांवर औषध खरेदी(३,३३५) | ५ |
| २२ | २००३-०४ | ३ | १ |
| २३ | २००४-२००५ | ७,१३,१४(१),१६,१७,२१,२३,२४,२५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र ७ :- २००३-२००४ अनुशेषांतर्गत बिगर आदिवासी योजनेअंतर्गत नव्याने निर्माण झालेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी २००४-२००५ मध्ये उपलब्ध तरतुदीनुसार आवर्ती व अनावर्ती खर्च करणे (३,४१८) | ९ |
| २४ | २००५-२००६ | ३,५,६,८,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२४,२६,२७,२८,२९,३०<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र. २७ :- दुधाळ जनावरांना पुरवठा करणे (३.१३०९) | २१ |

| २५ | सन २००६ - २००७ | २२ |
|---|---|---|
| परिच्छेद क्रमांक ३:- कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानाच्या अनुज्ञप्ती शुल्क व सेवाशुल्काच्या वसुलीबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ४:- कृत्रिम गर्भधारणा केंद्र सुरु करण्याकरीता यंत्रसामुग्री व साहित्य खरेदी करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ५:- श्वान दंश रोग प्रतिबंधक लस खरेदीतील अनियमितता. | | |
| परिच्छेद क्रमांक ६:- साथीच्या रोगावर औषधोपचार करण्यासाठी औषध खरेदी करण्यातील अनियमितता. | | |
| परिच्छेद क्रमांक ७:- बिगर आदिवासी योजनेमधून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाचे बळकटीकरण करण्यासाठी संगणक व संगणक साहित्य खरेदी करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ८:- म्हैस खरेदी प्रक्रियेतील अनियमिततेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ९:- अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी/जास्त खर्च रक्कमांबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १०:- २४०३ लेखाशिर्षाखालील अखर्चीत अनुदानाबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ११:- आदिवासी उपयोजनांतर्गत ५०% अनुदानावर दुधाळ जनावरांचा पुरवठा करणेच्या योजनेतील अनियमितता. | | |
| परिच्छेद क्रमांक १२:- सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण नसतांना नियमबाहयपणे वेतनवाढी दिलेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १३:- सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी दिलोबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १४:- बदली प्रवास भत्ता जादा प्रदानाबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १५:- गाई म्हशी खरेदीसाठी अनुदान वाटपाच्या योजेनेतील अनियमिततांबाबत | | |
| परिच्छेद क्रमांक १६:- विशेष घटक योजनेतून गाय/म्हैस वाटपाबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १७:- संकरीत गायी व म्हैस अनुदान वाटपातील अनियमिततांबाबत | | |
| परिच्छेद क्रमांक १८:- पशुसंवर्धन विभगास दिलेले लक्षांक पूर्ण न करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १९:- आदिवासी उपयोजनेतून संकरीत दुधाळ जनांवरे खरेदीबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक २०:- पशुसंवर्धन विभागांकडील मालमत्ता नोंदवहयांबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक २१:- ५०% अनुदानावर लाभार्थ्यांना म्हशींचा पुरवठा करण्याच्या योजनेतील अनियमितता. | | |
| परिच्छेद क्रमांक २३:- लेखा स्थिती. | | |
| परिच्छेद क्रमांक २४:- आक्षेप विवरणपत्र. | | |
| परिच्छेद क्रमांक २५:- अनुपालन व पोहोच. | | |

टिप:- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायात नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतीम समजण्यात यावेत.

## स्थानिक क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील आक्षेप

---

**परिच्छेद क्रमांक १ :- शेळया/ मेंढयाना जंतुनाशक औषधे खरेदीबाबत.**
**रक्कम रु. २,९७,५८९/-**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक यांचे आदेश क्र जि.प./प.स./एएचडी १८९/०७ दि. २९.०५.२००७ |
| तांत्रिक मंजुरी | मा. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन नाशिक विभाग तांत्रिक २/२/४२४०-४२/ दि. ०४.०६.२००७ |

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|
| १९२/२०.०९.२००७ | २,४७,६४२/- | वेट इंडिया |
| १९२/२०.०९.२००७ | ४९,९४७/-<br>२,९७,५८९/- | मेस्पार्क ड्रग्स ॲण्ड केमिकल्स |

मा. आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा.पुणे यांचे आदेश क्र. डिडिडी/१३४/६८०/२००६/पं.स.१२ पुणे दिनांक ३१.०३.२००६ अन्वये दिनांक ३१.०३.२००६ ते ३०.०६.२००७ या कालावधीसाठी औषधे खरेदीसाठी दरकरार (रेट कॉन्ट्रॅक्ट) करण्यात आलेला असुन त्यानुसार पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांनी वरीलप्रमाणे औषधे खरेदी केलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) औषधे सुस्थितीत व मागणीप्रमाणे प्राप्त झाली किंवा कसे याबाबत साठा नोंदवहीवर प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

२) औषधे व अन्न प्रशासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतुन औषधाच्या गुणवत्तेबाबत अहवाल प्राप्त केलेला नाही. त्याशिवाय औषधे वापरात आणलेबाबत मा. आयुक्तांचे क्षमापन घ्यावे. मुदतपूर्ती पूर्वीच औषधे पूर्णतः वापरल्याबाबत साठा नोंदवहीतील नोंदी दर्शवाव्यात.

३) साठा नोंदवहीवर औषधाची उत्पादन दिनांक व अंतिम दिनांक नमुद नाही.

४) पशुसंवर्धन विभागाकडील स्टॉक रजिस्टर( न.न.३३) व प्रमाणकाची पडताळणी केली असता विलंब आकार कमी वसुल केला आहे. भारतीय कंत्राट कायदा १८७२ चे कलम ४ नुसार पुरवठा आदेशाच्या दिनांकापासुन २१ दिवसांच्या आत मालाचा पुरवठा आवश्यक असतांना विलंबाने केला आहे.

| प्रमाणक क्र व दिनांक | रक्कम | पुरवठा आदेश क्र व दिनांक | प्रत्यक्षात माल प्राप्त स्टॉक न.न.३३ | जादा आठवडे | वसुल करावयाची रक्कम | दर | वसुल केलेली रक्कम | कमल वसुल रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९२/ २०.०९.०७ | २,४७,६४२ | २१२/ १२.०६.०७ | ४४,४५/ २०.०७.०७ | २ | २,४७६ | ०.५% | १,२३८ | १,२३८ |
| १९२/ २०.०९.०७ | ४९,९४७ | २१३/ १२.०६.०७ | ४६/ १७.०७.०७ | २ | ५०० | ०.५% | २५० | २५० |
| | | | | | | | | १,४८८ |

वरीलप्रमाणे पुर्तता करुन व रक्कम संबधित विक्रेत्याकडून शासन सदरी जमा करुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
जि.प.सेस
१२ पशुसंवर्धन जि.प.नाशिक.
अंतिम अमान्य रक्कम १,४८८/-
आक्षेपाधिन रक्कम रु. २,९६,१०१/-

(विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. १ पहा)
(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. १ पहा)

## स्थानिक क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील आक्षेप

**परिच्छेद क्रमांक २ :- जनावरांच्या प्रदर्शनास बक्षिस वाटपाबाबत.**

पशुसंवर्धन विभाग नाशिक यांनी सन २००७/०८ मध्ये पंचायत समिती, इगतपुरी यांना जनावराच्या प्रदर्शनास बक्षिस वाटपासाठी रक्कम रु. १,००,०००/- अदा केली आहे.

पशुसंवर्धन विभाग नाशिक यांचे आदेश क्र जि.प./प.स./एआएचडी/६१/ ०८ दिनांक १४.०२.०८ अन्वये दिनांक ३१.०३.०८ पर्यंत सविस्तर विनियोग दाखले सादर करावेत असे निर्देश असूनही सदर खर्चाच्या विनियोगासह उपप्रमाणके छायांकित प्रती/

सत्यप्रतीवर विभागास सादर केली नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष खर्चाच्या योग्यतेबाबत पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त नमुद आक्षेपाची पुर्तता करुन अनुपालन लेखापरिक्षणास दाखविण्यात यावे तोपावेतो खर्च रक्कम रु. १,००,०००/- लेखापरिक्षणास आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
१२, पशुसंवर्धन
आक्षेपाधिन रक्कम रु. १,००,०००/-

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. २ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- डिझेल कमी नोंदविल्याबाबत.**

जिल्हा परिषद नाशिक, पशुसंवर्धन विभागाचे वाहन क्र एम.एच.१५ अे.अे. २७०० चे लॉगबुक तपासले असता खालीलप्रमाणे डिझेल कमी नोंदविले आहे.

| दिनांक | पावती नंबर | पेट्रोल पंपाचे नाव | लॉग बुकात प्रत्यक्षात नोंद | नं.नं.३६ (लॉगबुक) डिझेल नोंद | खर्च रक्कम रुपये | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५.१२.२००७ | २६४७० | मे.मेट्रो सर्व्हीस स्टेशन ओझरमिग, नाशिक | १५ डिझेल लिटर | ४५ डिझेल लिटर | १,५५६ | १,०२० |
| **एकुण वसुलपात्र रक्कम रुपये-----** | | | | | | **१,०२०** |

उपरोक्त प्रमाणे ३० लिटर डिझेल कमी नोंद केल्याने लिटर ३० X दर ३४ प्रतिलिटर प्रमाणे रक्कम रुपये- १,०२०/- संबधितांकडुन वसुल करुन लेखाशिर्षाखाली शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
जिल्हा परिषद
पशुसंवर्धन
वसुलपात्र रक्कम रु. १,०२०/-

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ३ पहा)

---

**<u>परिच्छेद क्रमांक ४ :-</u> <u>वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.</u>**

सन २००७-२००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाचे वाहन एम.एच.१५ अेअे-२७०० च्या वाहन लेख्याची पडताळणी करण्यांत आली असता खालील दिलेल्या तपशिलाप्रमाणे वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर प्रवास केल्याच्या नोंदी आढळुन आल्या.

| अ.क्र | दिनांक | कोठून | कोठे | तपशील | कि.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३.०४.२००७ | नाशिक | मुंबई | गुणवंत कर्मचारी सत्कार पुस्तिका | ३९५ |
| २ | १०.१०.२००७ | नाशिक | मुंबई (चेंबुर) | विषय नाही. | ४१५ |
| ३ | २४.११.२००७ ते २५.११.२००७ | नाशिक | मुंबई | -- | ३८५ |
| ४ | ०६.१२.२००७ | नाशिक | पुणे | मा. आयुक्त कार्यालय, पुणे लसीकरण व मार्गदर्शनासाठी | ४२८ |
| ५ | १६.०१.२००८ | नाशिक | पुणे | मा. आयुक्त कार्यालय, पुणे | ४५२ |
| ६ | ०७.०२.२००८ | नाशिक | पुणे | मा. आयुक्त कार्यालय, पुणे | ४८५ |
| ७ | ०७.०३.२००८ | नाशिक | अहमदनगर | लेखन सामुग्री आणणेबाबत | ३३६ |
| | | | | **एकुण--** | **२८९६** |

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निणर्य ग्रा.वि.वि.क्र जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.०४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्रप्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा५/दि.०८.०७.०५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमिटर २८९६ ची रुपये २३,१६८/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष<br>
जिल्हा परिषद, नाशिक<br>
पशुसंवर्धन<br>
वसुलपात्र रक्कम रुपये २३,१६८/-

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ४ पहा)

**<u>परिच्छेद क्रमांक ५ :- रोखपाल पदासाठी रोख रक्कम हाताळणी पोटीच्या विशेष वेतनाबाबत.</u>**

जिल्हा परिषद नाशिक, पशुसंवर्धन विभागाचे सन २००७-२००८ चे लेखापरीक्षणाचे वेळी रोखपालाकडील माहे फेब्रुवारी पेड इन मार्च २००८ मधील प्रमाणकांची वेतनाची तपासणी केली असता रोखपालास विशेष वेतन रुपये ३००/- अदा केल्याचे आढळले.

शासन निर्णय क्र.डीडीओ-१००५/प्रक्र ५/कोष-/प्रशा/५ मुंबई दि.२९.०८.०५ अन्वये सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते बँकेमार्फत वितरीत करण्याच्या कार्यपध्दती अंमलात आली आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग निर्णय क्र. वेतन-१२९८/प्र.क्र१६/९८/सेवा-३, मुंबई दि. २३.१२.१९९८ नुसार किमान रु. ५०,०००/- पर्यंत रोख रक्कम हाताळणीबाबत विशेष वेतन रुपये-७५/- अनुज्ञेय आहे.

उपरोक्त नमुद अभिप्रायांनुसार सर्व कर्मचा-यांचे वेतन बँकेमार्फत होत असल्याने रु.३००/- विशेष वेतनाऐवजी रु.७५/- विशेष वेतन देय होते. माहे ऑगस्ट ०७ ते डिसेंबर २००८ या कालावधीसाठी त्यामुळे १७ X २२५ एकुण रक्कम रुपये-३,८२५/- संबधितांकडुन वसुल करावेत व त्यापुढे नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे अनुपालन दाखवावे.

लेखाशिर्ष
जिल्हा परिषद, नाशिक
पशुसंवर्धन विभाग
वसुलपात्र रक्कम रुपये ३,८२५/-

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ५ पहा)

---

**<u>स्थानिक क्षेत्र</u>**

**<u>मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील आक्षेप</u>**

**निरंक**

---

**<u>स्थानिक क्षेत्र</u>**

**<u>मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील आक्षेप</u>**

**निरंक**

---

# <u>शासकीय क्षेत्र</u>

## <u>मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता</u>

---

**<u>परिच्छेद क्रमांक ६ :- अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी/जास्त खर्च रकमाबाबत.</u>**

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नाशिक चे सन २००७-२००८ च्या लेख्याची तपासणी केली असता शासनाकडुन मिळालेले अनुदान व प्रत्यक्ष खर्च रकमा यांच्या ताळमेळामध्ये सोबत जोडलेल्या परि. क्र १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कमी/जास्त रकमा खर्च केलेल्या आहेत.

सदर कमी/जास्त खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १४० प्रमाणे अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जादा खर्च करणे अनियमित आहे. सदर जादा खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करुन व शासनाचे क्षमापन प्राप्त करुन अनुपालन दाखवावे.

२) रोख शिल्लक रक्कम रुपये ३७,८३,५११/- व अखर्चित रक्कम रुपये ५०,५८२/- एकुण रक्कम रुपये ३८,३४,०९३/- शासनाकडे त्वरीत भरणा करुन विलंबास शासनाचे क्षमापन घ्यावे.

३) सन २००७-२००८ साठी शासकीय अनुदानाच्या जमा खर्चाचे निर्धारण अप्राप्त आहे. अनुदान निर्धारणाच्या अधिन राहुन कमी/जास्त खर्चाबाबत आक्षेपात सुचित केल्यानुसार कार्यवाही करावी.

४) सन २००७-२००८ च्या शासकीय अनुदानाच्या जमा व खर्च रकमाचा ताळमेळ मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वित्त विभाग यांच्याकडुन प्रमाणित करुन घेतलेला नसल्याने अहवालासोबत जमा खर्च विवरण जोडण्यात आलेले नाही. प्राप्त अनुदान व त्या अनुषंगाने केलेला खर्च योग्य असल्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिका-यांचे प्रमाणपत्र घ्यावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ७ :- आदिवासी उपयोजनांतर्गत संस्थाना औषध पुरवठा</u>**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक यांचे आदेश क्र जिप/पंस/अेअेपडी २४१/०७ दि. २५.०६.२००७ |
| तांत्रिक मंजुरी | मा. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन नाशिक विभाग नाशिक यांचे आदेश क्र तांत्रिक २/२/४८८०-८१/ दि. २९.०६.२००७ |

| प्रमाणक क्र व दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|
| २३५/११.१०.२००७ | १३,३२,६६८ | वेट इंडिया |
| २३५/११.१०.२००७ | १,५८,९६५ | वेट इंडिया |
| २३५/११.१०.२००७ | ३,४३,९८८ | प्रशांती |
| २३५/११.१०.२००७ | ३,५०,०१३ | वेट इंडिया |
| **एकूण** | **२१,८५,६३४** | |

मा. आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा. पुणे यांचे आदेश क्र डिडिडी/१३४/६८०/२००६/पं.स.-१२/पुणे दि. ३१.०३.२००६ अन्वये दिनांक ३१.०३.२००६ ते ३०.०६.२००७ या कालावधीसाठी औषधे खरेदीसाठी दरकरार (रेट कॉन्ट्रॅक्ट) करण्यात आलेला असुन त्यानुसार पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांनी वरीलप्रमाणे औषधे खरेदी केलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) औषधे सुस्थितीत व मागणी प्रमाणे प्राप्त झाली किंवा कसे याबाबत साठा नोंदीवर प्रमाणपत्र देण्यात आलेली नाही.

२) अन्न व औषधे प्रशासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतुन औषधांच्या गुणवत्तेबाबत अहवाल प्राप्त केलेला नाही. त्याअभावीच औषधे वापरात आणलेबाबत मा. आयुक्तांचे क्षमापन घ्यावे.

३) माल प्रत्यक्षात केव्हा प्राप्त झाला याचा चलनावर उल्लेख नाही.

४) साठा नोंदवहीत औषधांचा उत्पादनाचा दिनांक व मुदतपूर्तीचा दिनांक नमुद नाहीत. मुदतीपूर्तीपूर्वीच औषधांचा पूर्णतः वापर झाल्याबाबत साठा नोंदवह्यांतील नोंदी दर्शवाव्यात.

५) औषधसाठा नोंदवहीत (नं.न. ३३) मध्ये कार्यालयाची माहोर उमटवून पान नंबर १ वर प्रमाणपत्र नमुद नाही.

६) पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखाने यांच्याकडील साठा नोंदवहया तपासल्या असता खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या आहेत.

पशुवैद्यकीय दवाखाना सटाणा, मालेगाव, बागलाण, दिंडोरी, पेठ यांचेकडे औषध पुरवठा प्राप्त झाल्याबाबत स्टॉक रजिस्टर नोंद नाही. जमा नोंदीसह विनियोग दर्शवावा.

वरीलप्रमाणे पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे तोपर्यंत खर्च रक्कम रुपये २१,८५,६३४/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
(००)(००३) पशुवैद्यकीय सेवा संस्था
औषध पुरवठा व शेळ्या मेंढयांना
जंतुनाशक औषध पुरवठा
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये २१,८५,६३४/-

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. १ पहा)

## परिच्छेद क्रमांक ८ :- योजनेत्तर योजना अंतर्गत औषधे खरेदी (रुग्णालये/दवाखाने)

| | | |
|---|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक यांचे आदेश क्र जिप/पंस/अेअपडी २०८/०७ दि. ११.०६.२००७ | |
| तांत्रिक मंजुरी | मा. प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, नाशिक विभाग, नाशिक यांचे आदेश क्र तांत्रिक २/२/७६७०-७१/ दि. २९.०९.२००७ | |
| **प्रमाणक क्र व दिनांक** | **रक्कम रुपये** | **तपशील** |
| १३७/१३.०८.२००७ | ५,२१,०६१ | अरिस फॉर्मासिटिकल |
| १३७/१३.०८.२००७ | १,८६,०७२ | अरिस फॉर्मासिटिकल |
| १३८/१३.०८.२००७ | ९४,४६५ | पुअर फॉर्मासिटिकल |
| १३७/१३.०८.२००७ | १,८८,९६० | पुअर फॉर्मासिटिकलु |
| १३७/१३.०८.२००७ | ९३,६०० | पुअर फॉर्मासिटिकल |
| १३७/१३.०८.२००७ | २,८४,५५७ | पुअर फॉर्मासिटिकल |
| ५५०/२८.०२.२००७ | १९,३५,१३५ | पुअर फॉर्मासिटिकल |
| ५५२/२८.०२.२००७ | ९९,९०० | पुअर फॉर्मासिटिकल |
| **एकुण** | **३४,०३,७५०** | |

मा. आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा. पुणे यांचे आदेश क्र डिडिडी/१३४/१२२८/२००७/पं.स.पुणे-१ दि. ३१.०६.२००७ अन्वये दिनांक ०१.०७.२००६ ते ३०.०९.२००७ या कालावधीसाठी औषधे खरेदीसाठी भावबंध करार (रेट कॉन्ट्रॅक्ट) करण्यात आलेला असुन त्यानुसार पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नाशिक यांनी वरीलप्रमाणे औषधे खरेदी केलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) औषधे सुस्थितीत व मागणी प्रमाणे प्राप्त झाली किंवा कसे याबाबत साठा नोंदीवर प्रमाणपत्र देण्यात आलेली नाही.

२) अन्न व औषधे प्रशासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतुन औषधांच्या गुणवत्तेबाबत अहवाल प्राप्त केलेला नाही. त्याशिवायच औषधे विनियोगात आणल्याबद्दल मा. आयुक्तांचे क्षमापन घ्यावे.

३) साठा नोंदवहीत औषधाची उत्पादन दिनांक व अंतिम दिनांक नमुद नाही. मुदतपूर्ती पूर्वीच सर्व औषधे वापरात आणलेबाबत साठा नोंदवह्यांतील नोंदी दर्शवाव्यात.

४) भारतीय कंत्राट कायदा कलम १८७२ चे कलम ४ नुसार पुरवठा आदेशाच्या दिनांकापासुन २१ दिवसांच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक असतांना पुरवठा विलंबाने केला आहे. सदरची रक्कम रु. ६७,६२७/- संबधित विक्रेत्याकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा केल्याचे अनुपालन दर्शवावे.

| प्रमाणक क्र व दिनांक | रक्कम | पुरवठा आदेश क्र व दिनांक | प्रत्यक्षात माल प्राप्त व स्टॉक रजि क्र | जादा आठ-वडे | वसुल करावयाची रक्कम व दर | वसूल केलेली रक्कम | कमी वसुल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३७/ १३.०८.०७ | ५,२१,०६१ | ३४३/ २९.०९.०७ | ७२,७३,७४/ ३.१२.०७ | ६ | १५,६३२ | १३,०२५ | २,६०७ |
| १३८/ १३.०८.०७ | ९४,४६५ | ३४४/ २९.९.०७ | ७६/ ३१.१०.०७ | २ | ९४४ | ० | ९४४ |
| १३८/ १३.०८.०७ | १,८८,९६० | ३४४/ २९.९.०७ | ७७,८१/ २९.११.०७ | ६ | ५,६७० | ९४५ | ४,७२५ |
| १३८/१३.० ८.०७ | ९३,६०० | ३४४/ २९.९.०७ | ७८/ ०८.१२.०७ | ७ | ३,२७६ | १,४०४ | १,८७२ |
| १३८/ १३.०८.०७ | २,८४,५५७ | ३४४/ २९.९.०७ | ७९,८०/ २४.१२.०७ | १० | १४,२२८ | ७,११५ | ७,११३ |
| ५५०/ २८.०२.०८ | ७,४९,३२२ | ३४२/ २९.०९.०७ | ६२,६३,६९/ १८.१२.०७ | ९ | ३३,७१४ | १४,९८८ | १८,७२६ |
| ५५०/ २८.०२.०८ | १,०५,६२४ | ३४२/ २९.०९.०७ | ६६/ १८.१२.०७ | ९ | ४,७५२ | २,११२ | २,६४० |
| ५५०/ २८.०२.०८ | १०,८०,१८९ | ३४२/ २९.०९.०७ | ६४,६५,६७, ६८,७०,७१/ २०.११.०७ | ५ | २७,००० | ० | २७,००० |
| ५५२/ २८.०२.०८ | ९९,९०० | ३४५/ २९.०९.०७ | ७५/ १७.१२.०७ | ८ | ४,००० | २,००० | २,००० |
| एकूण :- | ३२,१७,६७८ | | एकुण:- | | १,०९,२१६ | ४१,५८९ | ६७,६२७ |

उपरोक्त नमुद आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणात सादर करण्यात यावे. तो पावेतो खर्च रक्कम ३३,३६,१२३/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
१२ पशुसंवर्धन
जिल्हा परिषद, नाशिक
अंतिम अमान्य रक्कम ६७,६२७/-
आक्षेपाधिन रक्कम रु. ३३,३६,१२३/-

(विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. २ पहा)
(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ६ पहा)

**परिच्छेद क्रमांक ९ :- औषध पुरवठा विलंबाने केल्याबाबत.**

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांनी सन २००७-०८ मध्ये दर करारानुसार औषधे खरेदी केल्याचा खर्च खालीलप्रमाणे नोंदविलेला आहे.

(आकडे रुपयांत)

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | पुरवठा आदेश क्र. व दि. | प्रत्यक्षात माल प्राप्त न.नं. ३३ | जादा आठ-वडे | दर | वसूल करावयाची रक्कम | वसूल केलेली रक्कम | कमी वसूल केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३५ | ११.१०.०७ | १५८९६५ | २४८/ ३०.६.०७ | २५,२६ / २३.८.०७ | ५ | ५ | ३९७५ | २३८५ | १५९० |
| २३५ | ११.१०.०७ | ३५००१३ | २४९/ ३०.६.०७ | ३०,३१/ १४.८.०७ | ३ | ५ | ५२५० | १७५० | ३५०० |
| २३५ | ११.१०.०७ | ३४३९८८ | २५०/ ३०.६.०७ | ३२,३३/ १६.८.०७ | ४ | ५ | ६८८० | ३४४० | ३४४० |

पशुसंवर्धन विभागातील स्टॉक रजिस्टर(नं.न.३३) व प्रमाणकाची पडताळणी केली असता विलंब आकार कमी वसुल केला आहे. भारतीय कंत्राट कायदा १८७२ चे कलम ४ नुसार पुरवठा आदेशाच्या दिनांकापासुन २१ दिवसांच्या आत मालाचा पुरवठा आवश्यक असतांना विलंबाने केला आहे.

वरीलप्रमाणे पुर्तता करुन रक्कम संबधीत पुरवठादारांकडून वसुल करुन शासन सदरी जमा करुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
१२ पशुसंवर्धन
जिल्हा परिषद, नाशिक
अंतिम अमान्य रक्कम रु. ८,५३०/-

(विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. ३ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक १० :- साठा नोंदवहीवर औषधांची जमा नोंद नसल्याबाबत.**

अ) पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांनी सन २००७-०८ मध्ये खरेदी केलेल्या औषधाचे जिल्हास्तरावरील स्टॉक रजिस्टर तपासले असता खालीलप्रमाणे तालुक्यांना वाटप केलेली औषधे तालुकास्तरावरील साठा नोंदवह्यांना जमा घेतले नाही.

| अ. क्र | तालुका | जि. प. स्टॉक रजि.न. | वाटप नग व दिनांक | तालुका क्रमांक | जमा नग | कमी नग | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दिंडोरी | ५१ | ७८/०५.१०.०७ | - | - | ७८ | ३,९००.०० |
| २ | पेठ | ४७ | ३३०/०५.१०.०७ | - | - | ३३० | १,८१५.०० |
| | | ४८ | ३८/०५.१०.०७ | - | - | ३८ | १,७६३.०० |
| | | ४९ | ४१/०५.१०.०७ | - | - | ४१ | ३,०७५.०० |
| | | ५० | ६७/०५.१०.०७ | | - | ६७ | १,८६९.०० |
| | | ५१ | ३७/०५.१०.०७ | - | --- | ३७ | १,८५०.०० |
| | | ६२ | ९०/१५.१२.०७ | - | - | ९० | १,९३१.०० |
| | | ६३ | १८०/१५.१२.०७ | - | - | १८० | २,०७९.०० |
| | | ६४ | १२६/१८.११.०७ | - | - | १२६ | ६,३००.०० |
| | | ६५ | १८९/२०.११.०७ | - | - | १८९ | ८,४४८.०० |
| | | ६६ | ३६/१८.१२.०७ | - | - | ३६ | २०२.०० |
| | | ६७ | ११७/२०.११.०७ | - | - | ११७ | ८,७७५.०० |
| | | ६८ | १३५/३०.११.०७ | -- | - | १३५ | ३,७६७.०० |

उपरोक्त औषधांची नोंद साठा नोंदवहीवर न घेणे ही अनियमितता असुन जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागातील नमुना नं. ३३ वर औषधे ताब्यात मिळाल्याची स्वाक्षरी आहे. याबाबत संबधितांची चौकशी करुन ताब्यात घेतलेली औषधे विनियोगाशिवाय गहाळ झाली असल्यास रक्कम रु. ४५,७७४/- ची वसुली करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**<u>ब) औषधे कमी नोंदविल्याबाबत.</u>**

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नाशिक सन २००७-२००८ मध्ये खरेदी केलेल्या औषधेचे स्टॉक रजिस्टर क्र ३३ तपासले असता तालुकाना वाटप केलेल्या औषधे खालीलप्रमाणे कमी नोंदविलेली आहे.

| अ. क्र | तालुका | जि. प. स्टॉक रजि. क्र | वाटप नग व दिनांक | तालुका स्टॉक रजि क्र | जमा नग | कमी नग | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मालेगाव | ४१ | ६५०/२४.१०.२००७ | १८ | ५५० | १०० | ७७०.०० |
| | | ४७ | ६४०/२६.०६.२००७ | २४ | ५५० | ९० | ४९५.०० |
| | | ७७ | ७१४/२६.११.२००७ | ३७ | ७०० | १४ | १७४.०० |
| | | ८३ | ७०२/३१.०३.२००८ | ५४ | ७०० | २ | ३६.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | बागलाण | ७० | ६३/२०.११.२००७ | ४८ | ३३ | ३० | ३,०९०.०० |
| | | | | | | **एकुण** | **४,५६५.००** |

उपरोक्त कमी नोंदवलेली औषधांची रक्कम रुपये ४,५६५/- संबधीतांकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा केल्याचे अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष

पशुसंवर्धन

अंतिम अमान्य रक्कम रु. ४५,७७४/-

अंतिम अमान्य रक्कम रु. ४,५६५/-

एकूण अंतिम अमान्य रक्कम रुपये ५०,३३९/-

(विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. ४ पहा)

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता

---

### परिच्छेद क्रमांक ११ :- मुल्हेर पशुवैद्यकीय दवाखाना इमारत दुरुस्ती करणे ता. सटाणा

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | मुल्हेर पशुवैद्यकीय दवाखाना इमारत दुरुस्ती करणे |
| २ | प्रशासकीय मान्यता | मु.का.अ.जिपना/बांखा/पीबी२/१७४/०८ दि.०७.०३.०८ रु. ७५,०००/- |
| ३ | तांत्रिक मान्यता | जिपना/बांखा/पीबी२/प्रशा२/तामाक्र/४/०८ दि.२९.०२.०८ रु. ७६,६५८/- |
| ४ | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | रु ७५,०००/- |
| ५ | लेखाशिर्ष | २४०३ पशुसंवर्धन |
| ६ | निविदा / दरपत्रक प्रकार | लेबर फेडरेशन शिफारस |
| ७ | मक्तेदाराचे नाव व स्विकृत निविदा दर | चे. नवजीवन मजूर सह. सं. लि. दराने ता. सटाणा अंदाजपत्रकीय दराने |
| ८ | कार्यारंभ आदेश क्र. व दि. | जिपना/बांखा/इवद२/अर्थ४/३९१/०८ दि.१९.३.०८ |
| ९ | कामाची मुदत | ३१.०३.०८ |
| १० | मुदतवाढ | - |
| ११ | काम पूर्ण दिनांक | २९.०३.०८ |
| १२ | मोजमाप पुस्तिका क्र. व पृ.क्र. | ९४ पृष्ठ ३७ ते ४८ |
| १३ | कामावर झालेला एकूण खर्च | रु.७५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | अंतिम प्रमाणक क्र., दि. व रक्कम रु. | १०५१/३१.३.०८ रु. ७५,०००/- |
| १५ | इतर तपशील | - |

उपरोक्त कामावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) बाब क्र २ Providing structural steel work in truees- सदर बाबीचे दर रु. ४६,५९२.९० देय असतांना रु. ५००९२.९० प्रमाणे दिल्याने ०.२१० मे.टनासाठी रु. ७३५/- जादा प्रदान झाले आहे.

२) बाब क्र ६ Providing and applying wo coat of water proofing paint सदर बाबींच्या नोंदी मोजमाप पुस्तिका क्र ९४ वर पान क्र ४७ वर घेणेत आलेल्या आहेत. प्रत्यक्षात १३५.८० चौमी मोजमाप असतांना देयक अदा करतांना १४२.८९ चौमी प्रमाणे केल्याने परिमान ७.०९ साठी दर रु. १८.८४/- प्रमाणे रु. १३४/- जादा प्रदान झाले आहे.

रक्कम रुपये ८६९/- शासकीय अनुदानासाठी अंतिम अमान्य करण्यात येत आहे. रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

लेखाशिर्ष
२४०३ पशुसंवर्धन अनुदान
अंतिम अमान्य रक्कम रु. ८६९/-

(पहा विवरणपत्र ४(अ) चा अ. क्र ५ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- सधन कुकुट प्रकल्प नाशिक येथील रोखवहीत अंडीची विक्री रक्कम भरणा न केल्याबाबत.**

जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग यांचे अंतर्गत सधन कुकुट प्रकल्प, नाशिक येथील अंडी नोंदवही विहीत नमुन्यात ठेवलेली नसुन साध्या नोंदवहीत नोंद आहे. त्यात ६५८७ अंडी विक्रीची रक्कम खाडाखोड व व्हाईटनरचा वापर करुन बदलेली असुन त्यावर पशुधन विकास अधिकारी यांची स्वाक्षरी माहे एप्रिल -२००७ ते जुलै-२००७ नाही.

नोंदवहीत नोंद असलेली शिल्लक अंडी ६५८७ ची रुपये २/- प्रमाणे रक्कम रु. १३,१७४/- चौकशीअंती वसुल करुन शासन सदरी भरणा केल्याचे अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
पशुसंवर्धन
अंतिम अमान्य रक्कम रु. १३,१७४/-

(विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. ६ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- प्रमाणकाच्या रक्कमेपेक्षा जादा रक्कम प्रदान केल्याबाबत.**

पंचायत समिती निफाड यांनी प्रमाणक क्रमांक ७२८ दिनांक ३१.३.२००८ अन्वये श्री. व्ही. एन. धुमाळ, पशुधन पर्यवेक्षक यांना प्रवास भत्ता देयकापोटी रु. १,४८९/- प्रदान केले आहे. सदर देयकाची रक्कम रु. १,४४९/- असतांना सदरचे देयक रु.१,४८९/- या रक्कमेला प्रदानार्थ मंजुर करण्यात आले असुन रु.१,४८९/- प्रत्यक्ष प्रदान केले आहे.

उपरोक्त तपशीलानुसार श्री. व्ही. एन. धुमाळ यांना त्यांच्या मागणीपेक्षा रु.४०/- जादा प्रदान केले आहे. सदरची जादा रक्कम प्रदान रु. ४०/- संबधितांकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दर्शवावी.

२४०३ पशुसंवर्धन
प्रवासभत्ता
पं.स.निफाड
अंतिम अमान्य रक्कम रु. ४०/-

(विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. ७ पहा)

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील अनियमितता

## निरंक

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील अनियमितता

---

**परिच्छेद क्रमांक १४ :-  गाई म्हशी अनुदान वाटपाबाबत..**

अ) पंचायत समिती, कळवणकडील पशुसंवर्धन विभागामार्फत ५०% अनुदानाने गाई/म्हशी खरेदी करुन वाटप करण्यांत आलेल्या आहेत. त्यासाठी खालीलप्रमाणे शासकीय अनुदानातून खर्च करण्यांत आला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | ९०/२४.०३.२००८ | १,४५,६९० | |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | १२६/३१.०३.२००८ | १,१२,८७५ | |
| ३ | १२७/३१.०३.२००८ | ९,२९,३२५ | |
| | **एकुण** | **११,८७,८९०** | |

ब) पंचायत समिती, त्र्यंबकेश्वरकडील पशुसंवर्धन विभागामार्फत ५०% अनुदानावर गाई/म्हशी खरेदी करुन वाटप करण्यांत आलेल्या आहेत. उर्वरित खर्च खालीलप्रमाणे शासकीय अनुदानातून खर्च करण्यांत आला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | ४८/२९.०२.२००८ | ३,१२,००० | म्हैस खरेदी करणे. |
| २ | ८७/१८.०३.२००८<br>४९/२९.०२.२००८ | १,२०,०००<br>३,१२,००० | म्हैस खरेदी करणे.<br>म्हैस खरेदी करणे. |
| ३ | ८८/१८/०३/२००८<br>५०/२९.०२.२००८ | ८,५५०<br>२८,०८० | LIC रक्कम<br>LIC रक्कम |
| ४ | १.१२.२००८<br>१७७/२८.०३.२००८ | २,८८०<br>१६,३१८ | LIC रक्कम<br>LIC रक्कम |
| ५ | ७०/२९.१०.२००७ | ५९,९९० | म्हैस खरेदी करणे. |
| ६ | ६४/२२.१०.२००७ | ६५,६८० | म्हैस खरेदी करणे. |
| | **एकुण:-** | **९,२५,४९८** | |

क) पंचायत समिती, दिंडोरीकडील पशुसंवर्धन विभागामार्फत ५०% अनुदानावर गाई/म्हशी खरेदी करुन वाटप करण्यांत आलेल्या आहेत. उर्वरित खर्च खालीलप्रमाणे शासकीय अनुदानातून खर्च करण्यांत आला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २७/२४.०१२००८ | १,६८,००० | २९ लाभार्थी २ म्हशी खरेदी |
| २ | ४१/०५.०२.२००८ | २,८८,००० | कामी प्रती लाभार्थी रुपये |
| ३ | ७/१०.०३.२००८ | १,६२,००० | २५,७१०/- प्रमाणे अनुदान वाटप |
| ४ | ४१/१९.०३.२००८ | ७२,००० | २ लाभार्थी |
| ५ | १४/१०.०३.२००८ | ७,२९० | - |
| | **एकुण:-** | **७,३९,३५०** | |

मा. आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक एस.डी.एस./१७/१२९४/२०८/०६ पं.स. १३ दिनांक १५.५.२००६ चे मार्गदर्शक सुचनेनुसार खालील शर्ती व अटीचे पालन करण्यांत आलेले नाही.

१) लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना किमान ३ वर्ष व्यवसाय करणे आवश्यक असून त्यासाठी प्रत्येक जनावराचा तीन वर्षांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. त्यातील प्रथम वर्षाचा विमा शासन आदेशानुसार १ वर्षाचा उतरविणेत आलेला आहे, उर्वरित २ वर्षाचा विमा लाभार्थ्याने स्वखर्चाने उतरविला असल्याचे कागदपत्र लाभार्थ्यांकडून प्राप्त करुन तपासणी दाखविण्यांत यावेत.

२) दर ३ महिन्यांनी पशुविकास अधिकारी यांनी प्रत्येक अनुदानित जनावराची पडताळणी करुन सध्य: स्थिती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना देणे व लाभार्थींच्या अडचणी लक्षात घेवून त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याचे आढळून आले.

३) मंजूर लाभार्थी यादी संबधित ग्रामपंचायतीला देणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

४) सदरचे म्हशी गाई वाटपामुळे लाभार्थ्यांचे दैनंदिन राहणीमान, उत्पन्नात कशा प्रकारे व कितपत सुधारणा झाली. योजनेचा उद्देश काय झाला याचा कार्योत्तर अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे देण्यांत आलेली नाही. यामुळे योजनेची फल निष्पती कितपत सफल झाली हे स्पष्ट होत नाही.

उपरोक्त नमूद आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांत सादर करण्यांत यावे तो पावेतो खर्च रक्कम रुपये ११,८७,८९०/- लेखापरीक्षणांत तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
१२- पशुसंवर्धन विभाग,
गाई-म्हशी वाटप योजना,
अ) तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ११,८७,८९०/-
पंचायत समिती, कळवण
ब) तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ९,२५,४९८/-
पंचायत समिती त्र्यंबक
क) तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ७,३९,३५०/-
पंचायत समिती नांदगाव

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- कमी साध्य वार्षिक इष्टांकांबाबत :**

अ) पशुसंवर्धन विभाग पं.स. नांदगाव येथील पशुधन विकास विभागास दिलेले मासिक / वार्षिक इष्टांक व प्रत्यक्ष साध्य उद्दिष्टे यांविषयक माहिती पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | कामाचा तपशील | लाभांक | साध्य |
| --- | --- | --- | --- |
| १ | कृत्रिम रोपन | ८००० | १४४८ |
| २ | संकरित वासरे निर्मिती | ३२८७ | ३५४ |
| ३ | औषधोपचार | ४५००० | ३९५२४ |
| ४ | गर्भतपासणी | ८७७० | १२३१ |
| ५ | वंधत्व तपासणी | १३७० | ५९२ |
| ६ | शस्त्रक्रिया - लहान<br>मोठया | ४३७०<br>२५ | ३२३४<br>३ |
| ७ | रोग निदान नमुने तपासणी | ४३० | ४११ |
| ८ | | ४६०० | ३२३६ |
| ९ | कार्य मोहिम राबविणे | ८० | ८९ |

ब) पशुसंवर्धन विभाग पं.स. चांदवड येथील पशुधन विकास विभागास दिलेले मासिक / वार्षिक इष्टांक व प्रत्यक्ष साध्य उद्दिष्टे यांविषयक माहिती पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशील | दिलेले लाभांक | प्राप्त साध्य | कमी साध्य लाभांक |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | औषधोपचार | ३६,००० | २९,५९८ | ६४०२ |
| २ | खच्चीकरण | ४,४०० | २,६४९ | १७५१ |
| ३ | कृत्रिम रोपन | १०,५०० | ५,३७५ | ५१२५ |
| ४ | गर्भ तपासणी | ८,७७० | ३,२१२ | ५५५८ |

क) पशुसंवर्धन विभाग पं.स. सिन्नर येथील पशुधन विकास विभागास दिलेले मासिक / वार्षिक इष्टांक व प्रत्यक्ष साध्य उद्दिष्टे यांविषयक माहिती पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशील | वार्षिक दिलेले लाभांक | प्रत्यक्षात पुर्ण दिलेले लाभांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | औषधोपचार | ७५,००० | ३६,२७६ |
| २ | गर्भतपासणी | १२,४७० | ५,२९३ |
| ३ | कृत्रिम रोपन | २१,५०० | ७,१२८ |
| ४ | मोठया शस्त्रक्रिया | ६,४७० | ३,९३६ |
| ५ | केमीकल्स् | २,१५,५०४ | १,५७,२४५ |
| ६ | नमुने तपासणी | २,३४० | ५८३ |
| ७ | वंध्यत्व तपासणी | ३,८७५ | १,८३४ |
| ८ | खच्चीकरण | ६,३९५ | ३,८०० |
| ९ | लहान शस्त्रक्रिया | ६,४७२ | ३,९५० |

वरीलप्रमाणे दिलेल्या वार्षिक इष्टांकापेक्ष्ज्ञा प्रत्यक्ष कमी साध्य केलेल्या इष्टांकाबाबत सक्षम अधिका-याचे क्षमापन आदेश प्राप्त करुन अनुपालन येत्या परीक्षणांत दाखविण्यात यावे.

लेखाशिर्ष
१२ पशुसंवर्धन
पंचायत समिती, नांदगाव, चांदवड व सिन्नर

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- स्वयंरोजगारांतर्गत ५०% अनुदानावर गाई / म्हशी वाटपाबाबत**

स्वयंरोगारांतर्गत वैयक्तिक लाभ योजना स्वरुपात ५०% अनुदानावर गाई अथवा म्हशींचा गट लाभार्थ्यांना देण्यात येतो. या योजनेमध्ये दुग्धोत्पनाद्वारे लाभार्थ्यांच्या आर्थिक उत्पन्नात व अनुषंगाने राहणीमानात वाढ व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. दुग्धोत्पादनात झालेल्या वाढीच्या अचुक नोंदी ठेवण्यासाठी तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन देणा-या संबंधित पशुवैद्यकीय अधिका-याने प्रत्यक्ष भेटीत वस्तुस्थितीजन्य आकडेवारी गोळा करुन विहित नोंदवह्या परिपूर्ण ठेवणे व तसे नियमित अहवाल जिल्हा परिषद विभागास सादर करणे आवश्यक आहे.

पशुसंवर्धन विभागाकडे प्राप्त अशा वार्षिक अहवालांची पडताळणी करता प्रति लाभार्थी आर्थिक उत्पन्नात झालेली वाढ पुढीलप्रमाणे उदाहरणादाखल नमुद करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| पंचायत समिती नाशिक | रुपये २४,०००/- ते ३३,६००/- |
| पंचायत समिती पेठ | रुपये ९,६००/- ते १२,८००/- |
| पंचायत समिती सुरगाणा | रुपये ४७,५२०/- ते ५१,८००/- |

चा-याची सर्वसाधारण उपलब्धता शहरी बाजारपेठेची निकटता या बाबी विचारात घेतल्यास पंचायत समिती नाशिक व पेठ यांनी कळविलेली आकडेवारी सुसंगत आहे. मात्र पंचायत समिती सुरगाणा यांनी कळविलेली माहिती त्याच निकषांचा विचार करता नक्कीच अवास्तव व विसंगत आहे.

प्रभावी नियंत्रण व अचुक अंमलबजावणीच्या दृष्टीने अवास्तव अहवालांवर प्रशासकीय दृष्टया शंका उपस्थित होणे व सत्यता पडताळली जाणे अत्यंत आवश्यक आहे.

या दृष्टीकोनातून सर्वच तालुक्यांच्या अहवालांचे विश्लेषण करुन ते वास्तववादी असून योजनेची फलनिष्पती योग्य असल्याचे प्रमाणित करावे.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- अनुपालन व पोहोच**

या लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा, अधिनियम १९३० चे कलम(१) अन्वये अहवाल प्राप्त झाले पासून चार महिन्यांच्या आंत जिल्हा परिषदेच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविणेत यावे, तसेच प्रस्तुत अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच देणेत यावी.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर:**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई (पत्राने)
२) मा. सचिव, पशुसंवर्धन, दुग्धशाळा व मत्स व्यवसाय विभाग, मंत्रालय मुंबई.
३) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई.
४) मा. आयुक्त, नाशिक विभाग,नाशिकरोड.
५) मा. संचालक, पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
७) मा. सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक

**प्रत सस्नेह अग्रेषित**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई
२) मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
३) म. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

## विवरणपत्र क्रमांक ४ (अ)

## चालु लेखापरीक्षण अहवाल भाग – २ (अ) अंतिम अमान्य रक्कमा

| अ. क्र. | परि. क्र. | परिच्छेद संक्षिप्त तपशील | अनुदानाचा प्रकार | | | अभिकरण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आस्थापना | सप्रयोजन | योजना | योजनांतर्गत | योजनोत्तर |
| १ | १ | शेळया मेंढयांना जंतुनाशक औषधे खरेदीबाबत | | | | १,४८८ | |
| २ | ८ | योजनेत्तर योजना अंतर्गत औषधे खरेदी | | | | ६७,६२७ | |
| ३ | ९ | औषधे पुरवठा विलंबाने केल्याबाबत | | | | ८,५३० | |
| ४ | १० | साठा नोंदवहीवर औषधांची जमा नोंद नसल्याबाबत | | | | ५०,३३९ | |
| ५ | ११ | मुल्हेर पशुवैद्यकीय दवाखाना इमारत दुरुस्ती | | | | ८६९ | |
| ६ | १२ | सधन कुक्कुट प्रकल्प, नाशिक येथील रोखवहीत अंडीची विक्री रक्कम भरणा न केल्याबाबत | | | | १३,१७४ | |
| ७ | १३ | प्रमाणकाच्या रक्कमेपेक्षा जादा रक्कम प्रदान केल्याबाबत | | | | ४० | |
| | | | | | **एकूण** | **१,४२,०६७** | |

## विवरणपत्र क्रमांक ४ (ब)

## तात्पुरत्या अमान्य रक्कमा

| अ.क्र | परि.क्र. | परिच्छेद संक्षिप्त तपशील | तात्पुरती अमान्य रक्कमा |
|---|---|---|---|
| १ | ७ | आदिवासी उपयोजनांतर्गत संस्थांना औषध पुरवठा | २१,८५,६३४ |
| २ | १४ | गाई म्हशी अनुदान वाटपाबाबत | २८,५२,७३८ |
| | | **एकूण** | **५०,३८,३७२** |

## विवरणपत्र क्रमांक ८

## वसूलपात्र व आक्षेपाधिन रक्कमांचे विवरणपत्र

| अ.क्र. | परि. क्र. | परिच्छेद संक्षिप्त तपशील | वसूलपात्र रक्कम रुपये | आक्षेपाधिन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | १ | शेळया / मेंढयांना जंतुनाशक औषधे खरेदीबाबत | | २,९६,१०१.०० |
| २ | २ | जनावरांच्या प्रदर्शनास बक्षिस वाटप | | १,००,०००.०० |
| ३ | ३ | डिझेल कमी नोंदविल्याबाबत | १,०२०.०० | |
| ४ | ४ | वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत | २१,१६८.०० | |
| ५ | ५ | रोखपाल पदासाठी रोख रक्कम हाताळणी पोटीच्या विशेष वेतनाबाबत | ३,८२५.०० | |
| ६ | ८ | योजनेत्तर योजना अंतर्गत औषधो खरेदी | | ३३,३६,१२३.०० |